# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

## जाहीरात क्रमांक १४५५/२०२२

## शैक्षणिक अर्हता व अर्ज सादर करणेकामी मुदतवाढ देणेबाबत जाहीर निवेदन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थायी आस्थापनेवर सल्लागार पद करार पंध्दतीने दरमहा एकत्रित मानधनावर फक्त ११ महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात भरण्याकामी जाहिरात क्र.१४५५/२०२२, दिनांक १७/०३/२०२२ अन्वये प्रसिध्द करण्यात येऊन, अर्हताधारक इच्छूक उमेदवारांकडून प्रशासन विभागात अर्ज मागविणेत आले होते. जाहिरातीद्वारे फक्त एकच अर्ज प्राप्त झाला आहे.

प्रस्तूत जाहीरातीमधील सल्लागार पद हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागांतर्गत अत्यावश्यक सेवेतील आहे,त्यामुळे तुलनात्मक स्पर्धा होण्यासाठी पुरेसे उमेदवार असणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तूत भरतीसाठी पुरेसा प्रतिसाद प्राप्त होणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील अटी व शर्तीमधील शैक्षणीक व अनुभवाची अर्हता शिथील करण्यात येत असून सदरच्या जाहिरातीस मुदतवाढ देण्यात येत आहे

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उप अभियंता(स्थापत्य) / कार्यकारी अभियंता(स्थापत्य) पदावर काम केलेले व पाणीपुरवठा विभागात सलग ०३ वर्ष कामाचा अनुभव असलेले अधिकारी तसेच फक्त सेवानिवृत्त उप अभियंता(स्थापत्य) / कार्यकारी अभियंता(स्थापत्य) पदावरील उमेदवारांसाठी ६५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल राहील.**

सदर निवेदनाद्वारे कळविण्यात येते की, जाहिरात क्र.१४५५/२०२२ मधील सल्लागार पदाकरीता वरील नमूद अर्हतेनुसार अर्ज करण्याची अंतिम मुदत दिनांक ३१/०३/२०२२ रोजी सायंकाळी ६.१५ पर्यंत वाढविण्यात येत आहे. तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी त्यांचे अर्ज मा.आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे नावे, महानगरपालिकेची मुख्य इमारत, चौथा मजला,प्रशासन विभाग येथे समक्ष दिनांक ३१/०३/२०२२ पर्यंत सादर करावे.

उपरोक्त जाहिरातीच्या अनुषंगाने पदांकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा,अनुभव तसेच नियुक्तीच्या अटी व शर्ती, मानधन यांचा तपशील इत्यादी बाबी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर भरती (Recruitment) या लिंकवर तसेच होमपेजवर आमच्या बद्दल (About) ➔ नोकरी विषयक (Recruitment) या मेनूमध्ये पाहण्यास उपलब्ध आहेत.

23/03/22

आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

क्रमांक प्रशा/१/कावि/ ९४८ /२०२२
दिनांक 23 /०३/२०२२